# SPANDAN CAREER INSTITUTE

THE WAY OF SUCCESS…

**D**

Mob. No. 9923262977

Date :19/12/2021

**प्रश्नपुस्तिका क्र.** / **BOOKLET No.** **GS2021**


**Total Que. : 100**
**Marks : 200**
**Time : 120 min**

**राज्यसेवा (पूर्व) सराव परिक्षा - 2021**
**विषय : — सामान्य अध्ययन [011]**
**पेपर क्र. (४४)**

**सूचना**

१. सदर प्रश्नपुस्तिकेत १०० अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरूवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका पर्यवेक्षकाकडून लगेच बदलू

२. आपला परीक्षा—क्रमांक हया चौकोनांत न विसरता बॉलपेनने लिहावा.




३. वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे न विसरता नमूद करावा.

४. अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला ४ पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना १,२,३ आणि ४ असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवर सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करतांना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी.

५. सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. अशा प्रकारे प्रश्न सोडविणे सोयीस्कर आहे; पण एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे. अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नाकडे परतणे सोईस्कर ठरेल.

६. उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

७. प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरापैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या **प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी एक चतुर्थांश गुण वजा करण्यात येतील**.

**Note : Test Series Paper Online available**

**Visit us**

www.spandancareers.org

१. आदिवासी जमाती व त्यांचे नृत्यप्रकार यांची खालीलपैकी अयोग्य जोडी कोणती ती ओळखा ?

१) भिल्ल — घुमर
२) गौंड — कर्मा
३) वारली — कांबडी नृत्य
४) कोरकू — डेमसा नृत्य

२. योग्य जोडया लावा.

| अभयारण्य | स्थान |
|---|---|
| १) किनवट | अ) कोल्हापूर |
| २) कर्नाळा | ब) अहमदनगर |
| ३) रेहेकुरी | क) रायगड |
| ४) दाजीपूर | ड) यवतमाळ व नांदेड |

१) अ ब क ड
२) ड क ब अ
३) ब ड क अ
४) अ ब ड क

३. महाराष्ट्रात पुढीलपैकी कोणत्या राष्ट्रीय उद्यानात व्याघ्र प्रकल्प राबविला जात नाही ?


१) पेंच राष्ट्रीय उद्यान
२) ताडोबा राष्ट्रीय उद्यान
३) नवेगाव राष्ट्रीय उद्यान
४) संजय गांधी राष्ट्रीय उद्यान

४. महाराष्ट्र व मध्य प्रदेशाच्या सीमेवर असणाऱ्या सातपुडा पर्वतरांगेबद्दल अयोग्य विधान कोणते ते ओळखा ?

अ) या पर्वतरांगेची उंची पश्चिमेकडून पूर्वेकडे वाढत जाते
ब) सातपुडा पर्वतरांगेची समुद्रसपाटीपासून सरासरी उंची ६३० मी. इतकी आहे
क) या डोंगररांगेत विदर्भाचे महाबळेश्वर अमरावती जिल्हयात आहे

१) अ व क
२) फक्त ब
३) फक्त क
४) यापैकी एकही नाही

५. नकाशात दर्शविण्यात आलेली ठिकाणे पुढीलपैकी काय दर्शवितात ?



१) ज्योतिलिंगाची ठिकाणे
२) धबधबे
३) भुईकोट किल्ले
४) लेण्यांची ठिकाणे

६. अमेरिकेतील 'न्यु इंग्लंड' या राज्यात खालीलपैकी कोणते महत्वाचे शहर आहे ?

१) शिकागो
२) बोस्टन
३) सेंट पॉल
४) पिटर्सबर्ग

७. खालील पर्यायातून अयोग्य पर्याय कोणता तो निवडा ?

अ) महाराष्ट्रातील बॉक्साईटचे साठे जांभा खडकात आहेत
ब) सहयाद्रीमधील बॉक्साईट उच्चप्रतीचे असून, त्यातील ॲल्युमिनियम ऑक्साईडचे प्रमाण ५०% हून अधिक आहे.
क) रत्नागिरी जिल्हयात आंबाघाटाच्या पायथ्याशी बॉक्साईटचे साठे आहेत

१) फक्त क
२) फक्त ब
३) ब व क
४) यांपैकी एकही नाही

८. खालीलपैकी कोणत्या ग्रहावर सर्वात मोठा दिवस असतो ?

१) पृथ्वी
२) शुक्र
३) गुरु
४) बुध

९. २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात इतर राज्यांतून झालेल्या स्थलांतराच्या प्रमाणानुसार योग्य उतरता क्रम लावा ?

१) उत्तरप्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल, राजस्थान
२) बिहार, उत्तरप्रदेश, कर्नाटक, पश्चिम बंगाल
३) उत्तरप्रदेश, कर्नाटक, गुजरात, मध्यप्रदेश
४) उत्तरप्रदेश, कर्नाटक, बिहार, राजस्थान

१०. जगातील प्रमुख 'लोकर उत्पादन' करणारा देश खालीलपैकी कोणता आहे ?

१) ऑस्ट्रेलिया
२) कॅनडा
३) न्युझिलंड
४) अर्जेंटिना

११. राज्याच्या एकूण उद्योग उत्पादन मूल्यात कोणत्या उद्योगांचा सर्वाधिक वाटा आहे ?

१) रसायन उद्योग
२) मूलभूत धातू
३) कोळसा, शुध्द पेट्रोलियम
४) मोटार वाहन उद्योग

१२. खालीलपैकी कोणते सरोवर हे 'खाजन' नाही ?

१) पेरीयार
२) पुलीकत
३) चिल्का
४) अस्तमुदी

१३. खालील पर्यायातून कोणते विधान योग्य नाहीत ते निवडा ?

अ) कोकण रेल्वेवरील ६८ पैकी ३४ रेल्वेस्थानक महाराष्ट्रात आहेत
ब) कोकण रेल्वेवर महाराष्ट्रात असणाऱ्या स्थानकांपैकी सर्वाधिक स्थानके रायगड या जिल्हयात आहेत.

१) फक्त अ
२) फक्त ब
३) अ व ब
४) यापैकी नाही

१४. भारतामध्ये पवनऊर्जा क्षेत्रात खालीलपैकी अग्रेसर राज्य कोणते ?

१) गुजरात
२) महाराष्ट्र
३) ओरिसा
४) तामिळनाडू



www.spandancareers.org

१५. पुढीलपैकी कोणती दोन शहरे दक्षिण – मध्य रेल्वेमार्गांनी जोडली गेलेली नाहीत ?
१) मनमाड – दौंड – सोलापूर २) अकोला – पुर्णा
३) मनमाड – अंकाई – परभणी ४) अकोला – खंडवा

१६. 'तूर' या पिकाबाबत खालीलपैकी योग्य विधान कोणते ते ओळखा ?
अ) या पिकाची पाने संयुक्त प्रकारची असतात
ब) यामध्ये प्रथिनांचे प्रमाण सर्वांत अधिक असते
क) यांच्या झुडपाची फूले पिवळया रंगाची असतात
ड) विशेषत: पाण्याची उपलब्धता असणाऱ्या भागात हे पीक मोठया प्रमाणात घेतले जाते
१) अ व क योग्य २) ब, क, ड योग्य ३) अ, ब, क योग्य ४) वरील सर्व योग्य

१७. लोकसंख्येची घनता म्हणजे ? याबाबत अचूक पर्याय निवडा
१) दर चौ.कि.मी. मागे असणारे लोकसंख्येचे प्रमाण
२) दर १० चौ.कि.मी. मागे असणारे लोकसंख्येचे प्रमाण
३) दर १०० चौ.कि.मी. मागे असणारे लोकसंख्येचे प्रमाण
४) दर १००० चौ.कि.मी. मागे असणारे लोकसंख्येचे प्रमाण

१८. भारतात अनुसूचित जमातीच्या संख्येचे एकूण लोकसंख्येशी प्रमाण सर्वात अधिक असलेले राज्य म्हणजे ..................
१) गुजरात २) तामिळनाडू ३) मिझोराम ४) ओरिसा

१९. जागतिक हवामानाच्या दृष्टिकोनातून महाराष्ट्राचा समावेश कोणत्या हवामान प्रदेशात होतो ?
१) शीत कटिबंध
२) उष्ण कटिबंधीय मोसमी हवामानाचा प्रदेश
३) समशितोष्ण कटिबंधीय मोसमी हवामानाचा प्रदेश
४) विषुववृत्तीय हवामानाचा प्रदेश

२०. वैनगंगा – कन्हान व अंबा या त्रिवेणी संगमावर वसलेले नागपूर जिल्हयातील एक तीर्थक्षेत्र पुढीलपैकी कोणते ते ओळखा ?
१) रामटेक २) कळमेश्वर ३) अभोरा ४) कामठी

२१. विधान अ : महाराष्ट्रात साखर उद्योग विशेषत: ऊस लागवडीच्या क्षेत्राजवळच स्थिरावले आहे.
विधान ब : ऊसतोडणीनंतर त्याच्या वजनात घट होणे व ऊसाचा उतारा कमी होणे
१) विधान अ चूक, ब बरोबर
२) विधान अ व ब बरोबर, ब हे अ चे योग्य स्पष्टीकरण आहे
३) विधान अ बरोबर, ब चूक
४) विधान अ व ब बरोबर, अ हे ब चे योग्य स्पष्टीकरण आहे

२२. वित्तीय तुट भरुन काढण्यासाठी खालीलपैकी कोणते उपाय अवलंबिले जातात ?
अ) मध्यवर्ती बॅंकेकडून तारणाच्या आधारे घेतलेले कर्ज ब) अंतर्गत आणि बाहय कर्जामार्फत
१) फक्त अ बरोबर २) फक्त ब बरोबर ३) दोन्ही बरोबर ४) दोन्ही चूक

२३. भारतात उत्पादीत सर्व फळांवर .................. प्रमाणिकरण केलेले चिन्ह लावणे अनिवार्य आहे. योग्य पर्याय निवडा ?
१) एफपिओ मार्क २) इंडिया ऑरगॅनिक मार्क ३) हॉलमार्क ४) एगमार्क

२४. ३० दिवसाच्या कालावधीतील सर्व उपभोग्य वस्तूंच्या उपभोग खर्चाच्या आकडेवारीचा .............. समावेश होतो.
१) URP २) MRP ३) MMRP ४) यापैकी नाही

२५. विश्व बॅंकच्या अहवालानुसार जागतिकीकरण म्हणजे काय ?
अ) उपभोग वस्तूंसह सर्व वस्तूंच्या आयातीवरील नियंत्रणे हळूहळू समाप्त करणे
ब) आयात शुल्काचा दर कमी करणे
क) सार्वजनिक क्षेत्रांचे खाजगीकरण करणे होय
१) अ आणि ब २) अ, ब, क ३) अ व क ४) फक्त क

२६. खालील पर्यायातून अयोग्य विधान कोणते ते निवडा
१) सुवर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना – १९९७ २) प्रधानमंत्री ग्राम सडक योजना – २०००
३) जननी सुरक्षा योजना – २००५ ४) मध्यान्ह योजना – १९९५

२७. मनरेगा विषयी असत्य विधान निवडा ?
१) ही योजना २ फेब्रुवारी २००६ ला भारत सरकारच्या ग्रामीण मंत्रालयामार्फत सुरु करण्यात आली
२) या योजनेत किमान रोजगार १२७ रु. प्रतिदिन इतका मिळतो
३) अर्ज केल्यानंतर किमान ३० दिवसाच्या आत काम मिळाले नाही तर बेरोजगारी भत्ता दिला जातो
४) ग्रामीण भागातील अकुशल कामगारांना या योजनेचा लाभ घेता येतो

२८. धनादेश म्हणजे काय ?
१) खातेदाराने बॅंकेला दिलेली लेखी आज्ञा २) एका बॅंकेने दुसऱ्या बॅंकेला दिलेली लेखी आज्ञा
३) बॅंकेने खातेदाराला दिलेली लेखी आज्ञा ४) खातेदाराला बॅंकेशी केलेले करार पत्रक

२९. खालील विधाने लक्षात घ्या
अ) खाजगी बॅकावर रिझर्व्ह बॅकेचे फारसे नियंत्रण नसल्याने अनेक बॅका दिवाळखोरीत निघाल्या
ब) रिझर्व्ह बॅक ऑफ इंडियाचे १९४९ मध्ये राष्ट्रीयीकरण करण्यात आले
१) फक्त अ बरोबर २) फक्त ब बरोबर ३) दोन्ही बरोबर ४) दोन्ही चूक

३०. नियोजन प्रक्रियेतील एकमेव संवैधानिक संस्था म्हणून कोणत्या संस्थेचा उल्लेख करावा लागेल ?
१) राष्ट्रीय नियोजन मंडळ २) जिल्हा नियोजन व विकास परिषद
३) राज्य नियोजन मंडळ ४) राष्ट्रीय विकास परिषद

३१. सन २०११ च्या जनगणनेनुसार भारतातील सर्वात अधिक लोकसंख्या असलेली पाच शहरे त्याच्या उतरत्या लोकसंख्येच्या क्रमाने लावा
१) मुंबई, दिल्ली, बंगलोर, हैदराबाद, अहमदाबाद २) मुंबई, दिल्ली, कोलकाता, चेन्नई, बंगलोर
३) मुंबई, दिल्ली, बंगलोर, अहमदाबाद, हैदराबाद ४) मुंबई, दिल्ली, हैदराबाद, बंगलोर, अहमदाबाद

३२. खालीलपैकी कोणत्या योजनेत प्रथमच 'सूचक आर्थिक नियोजना'वर भर देण्यात आला ?
१) चौथी योजना २) सरकती योजना ३) आठवी योजना ४) अकरावी योजना

३३. व्यापारी बॅकाबाबत योग्य विधान ओळखा.
अ) व्यापारी बॅका पत निर्मिती करतात.
ब) व्यापारी बॅका चलन नियंत्रण करतात
क) व्यापारी बॅका लोकांच्या ठेवीचे संरक्षण करतात
१) अ, ब, क २) अ व क ३) ब व क ४) अ व ब

३४. विदेशातल कोणत्या देशात भारतीय बॅकाच्या शाखा सर्वाधिक आहे ?
१) अमेरिका २) सिंगापूर ३) इंग्लंड ४) मॉरिशस

३५. वंगभंगविरोधी आंदोलनाचे नेतृत्व कोणी केले होते ?
अ) सुरेंद्रनाथ बॅनर्जी ब) बिपीनचंद्र पाल क) आनंद मोहन बोस ड) रवींद्रनाथ टागोर
१) अ, ब, क २) ब, क, ड ३) अ, ब, ड ४) अ, क, ड

३६. महात्मा फुलेंनी शेतकऱ्यांची कैफियत हा ग्रंथ केव्हा लिहिला ?
१) १८८३ २) १८५४ ३) १८५३ ४) १८६२

३७. मुंबईत आझाद रेडिओची स्थापना कोणी केली ?
१) अरुणा असफअली २) क्रांतीसिंह नाना पाटील
३) ऊषा मेहता व विठ्ठल झवेरी ४) हंसाबेन मेहता – ऊषा मेहता

३८. सिंधू संस्कृतीच्या वैशिष्टयाबाबत योग्य विधाने ओळखा ?
अ) सर्व नगरांना तटबंदी होती ब) मंदिरांचा अभाव दिसून येतो
क) कास्ययुगीन संस्कृती ड) व्यापार प्रधान संस्कृती
१) अ, क, ड २) ब, क, ड ३) अ, ब, ड ४) सर्व योग्य

३९. बिहारमधील कोणाचा उठाव दडपण्यासाठी इंग्रजांना अनेक वर्षे लष्करी मोहिमा राबवाव्या लागल्या ?
१) जमीनदारांचा उठाव २) शेतकऱ्यांचा उठाव ३) भिल्लांचा उठाव ४) संथाळांचा उठाव

४०. खालील विधाने घेऊन योग्य पर्याय निवडा ?
अ) होमरुळ लीगच्या स्थापनेची मुळ कल्पना लोकमान्य टिळकांची होती
ब) होमरुळ लीगचे सविस्तर वितरण ॲनी बेझंट यांनी 'कॉमनवील' या वृत्तपत्रात दिले
क) महाराष्ट्र, कर्नाटक, मध्यप्रदेश आणि बरार येथे होमरुळचे कार्य टिळकांकडे होते
१) अ, ब आणि क २) फक्त अ ३) ब आणि क ४) अ आणि क

४१. बल्बनने प्रत्येक विभागात कोणाची नेमणूक केली होती ?
१) गुप्तहेर २) वजीर ३) दिवाण ४) संग्राहक

४२. खालील विधाने लक्षात घ्या
अ) जालीयनवाला बाग हत्याकांडास पंजाब गव्हर्नर ओडवायर जबाबदार होता
ब) रवींद्रनाथ टागोरांनी सर पदवी परत केली
१) अ व ब बरोबर असून ब हे अ चे योग्य स्पष्टीकरण देते
२) अ, ब बरोबर असून ब हे अ चे योग्य स्पष्टीकरण नाही
३) अ बरोबर, ब चूक
४) अ चूक, ब बरोबर

४३. नागपूरचे 'झेंडा आंदोलन' कोणाच्या नेतृत्वात झाले ?
१) सरदार पटेल २) महात्मा फुले ३) नामदार भोसले ४) सरोजीनी नायडू

www.spandancareers.org

४४. योग्य विधान ओळखा
अ) मध्यश्मयुगाच्या शेवटी शेतीचा शोध लागला ब) या काळातील मानव पशुपालन करु लागले
१) अ व ब दोन्ही बरोबर असून ब हे अ चे स्पष्टीकरण देते
२) अ व ब दोन्ही बरोबर असून ब हे अ चे स्पष्टीकरण नाही
३) दोन्ही चूक
४) अ व ब दोन्ही बरोबर असून अ हे ब चे स्पष्टीकरण देते

४५. तुळशीराम जाधवांचा गांधी टोपीचा सत्याग्रह कोणत्या ठिकाणी झाला ?
१) पुणे २) सोलापूर ३) बीड ४) सातारा

४६. स्वातंत्र्यवीर सावरकरांविषयी अचूक विधाने ओळखा.
अ) १९०० साली 'मित्रमेळा' ही क्रांतीकारक गुप्त संघटना स्थापन केली
ब) १९०४ मध्ये 'मित्रमेळा' संघटनेला 'अभिनव भारत' नाव देण्यात आले
क) १८५७ चे स्वातंत्र्यसमर हा ग्रंथ त्यांनी लिहिला
ड) सावरकरांना फाशीची शिक्षा देण्यात आली
१) अ, ब, क, ड २) ब, क, ड ३) अ, ब, क ४) अ आणि ब

४७. १९१९ मध्ये 'कैसर–ए–हिंद' ही पदवी देऊन सरकारने कोणचा गौरव केला ?
१) पंडिता रमाबाई २) डॉ. आंबेडकर ३) महर्षी कर्वे ४) रमाबाई रानडे

४८. बुध्दांनी खालीलपैकी कोणत्या ठिकाणी सर्वाधिक प्रवचने दिली ?
१) वाराणसी २) लुंबिनी ३) श्रावस्ती ४) सारनाथ

४९. १८१३ च्या चार्टर ॲक्ट नुसार कोणत्या तरतुदी करण्यात आल्या ?
अ) ब्रिटीश ईस्ट इंडिज कंपनीचा भारतातील व्यापार एकाधिकार रद्द करण्यात आला.
ब) चीनमधील ब्रिटीश ईस्ट इंडिज कंपनीचा एकाधिकार रद्द करण्यात आला
क) ख्रिस्ती धर्मगुरुंना भारतात धर्मप्रसाराची परवानगी
ड) शिक्षणावर दरवर्षी १ लाख रु. खर्च करण्याची तरतूद देण्यात आली
१) अ, ब, क २) ब, क, ड ३) अ, ब, ड ४) अ, क, ड

५०. 'लोकहितवादी' यांच्याविषयी योग्य विधाने ओळखा ?
अ) त्यांचे नाव गोपाळ हरी देशमुख असे होते
ब) त्यांचा जन्म १८ फेब्रुवारी १९२३ रोजी पुणे येथे झाला
क) त्यांना सरकारने 'रावबहादुर' ही पदवी दिली
ड) मूळ आडनाव सिध्दये
१) अ, ब, क, ड २) ब, क, ड ३) अ, क, ड ४) यापैकी नाही

५१. खालील पर्यायातून अयोग्य पर्याय निवडा.
१) ग्राम पंचायतीची बैठक प्रत्येक महिन्यात होते २) जिल्हा परिषदाच्या वर्षातून ४ बैठका होतात
३) ग्रामसभेच्या ही वर्षातून ४ बैठका होतात ४) यापैकी एकही नाही

५२. 'लोकलेखा समिती'च्या अध्यक्षाची नेमणूक कोण करतो ?
१) राष्ट्रपती २) लोकसभेतील विरोधी पक्षनेता ३) लोकसभा सभापती ४) केंद्रीय वित्तमंत्री

५३. राज्य वित्त आयोगाची स्थापना कोणत्या कलमानुसार करण्यात येते ?
१) कलम – २६० २) कलम – २४३ ३) कलम – १०१ ४) कलम – २८९

५४. भारत हे संघराज्य आहे. कारण.................
१) केंद्र व राज्यामध्ये अधिकाराची विभागणी २) लिखित राज्यघटना
३) दुहेरी न्यायव्यवस्था आहे ४) दुहेरी नागरिकत्वाची तरतूद आहे

५५. खालीलपैकी कोणत्या राज्यात 'पंचायत राज' संस्था अस्तित्वात नाही ?
१) नागालॅंड २) महाराष्ट्र ३) आसाम ४) मध्यप्रदेश

५६. ग्रामपंचायतीचा कार्यकाल कमी–जास्त करण्याचा अधिकार कोणाला असतो ?
१) राज्यशासन २) मुख्य कार्यकारी अधिकारी ३) गटविकास अधिकारी ४) जिल्हाधिकारी

५७. राज्यसभेच्या सदस्यांची मुदत किती वर्ष असते ?
१) अडीच वर्षे २) सहा वर्षे ३) चार वर्षे ४) पाच वर्षे

५८. खालील पर्याय विचारात घ्या
विधान अ : मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी न झाल्यास न्यायालयाकडे दाद मागता येत नाही
स्पष्टीकरण ब : देशाच्या शासनकारभारात मार्गदर्शक तत्वे ही मुलभूत आहेत
१) विधान अ व ब दोन्ही योग्य असून ब हे अ चे योग्य स्पष्टीकरण आहे
२) विधान अ व ब दोन्ही योग्य असून ब हे अ चे योग्य स्पष्टीकरण नाही
३) विधान अ योग्य व ब अयोग्य
४) विधान अ अयोग्य व ब योग्य

www.spandancareers.org

५९. खालीलपैकी पंचायत राजच्या संदर्भात नसलेली समिती कोणती आहे ?
१) दिनेश गोस्वामी समिती २) जी. व्ही. के. राव समिती
३) सिंघवी समिती ४) अशोक मेहता समिती

६०. २६ नोव्हेंबर १९४९ ला राज्यघटना स्वीकृती करण्यात आली. त्यावेळेला घटनेत किती कलमे आणि परिशिष्टे अंतर्भूत होती ?
१) ३९५ कलम व ८ परिशिष्टे २) ३१५ कलमे व ७ परिशिष्टे
३) ३९८ कलमे व ८ परिशिष्टे ४) ३९८ कलमे व ६ परिशिष्टे

६१. महाराष्ट्राच्या कायदेमंडळात खालीलपैकी कोणाचा समावेश होतो ?
अ) राज्यपाल ब) विधानसभा क) विधानपरिषद ड) महाधिवक्ता
१) फक्त ब व क २) अ, ब, क ३) फक्त अ व ब ४) अ, ब, क, ड

६२. भारतीय राज्यघटनेचे वर्णन कसे करता येईल ?
१) अधिक ताठर, कमी लवचिक २) अधिक लवचिक, कमी ताठर
३) ना लवचिक, ना ताठर ४) वरीलपैकी नाही

६३. भारतातील किती राज्यात विधानपरिषद अस्तित्वात आहे ?
१) ३ २) १० ३) ६ ४) ५

६४. राज्यघटनेया कलम २१ नुसार कोणता अधिकार देण्यात आलेला आहे ?
१) रोजगाराचा अधिकार २) अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार
३) जगण्याचा अधिकार ४) धर्मस्वातंत्र्याचा अधिकार

६५. खालील पर्याय विचारात घ्या
विधान अ : पंतप्रधान कार्यालयाच्या योजना निर्मितीवर प्रभाव असतो
स्पष्टीकरण ब : पंतप्रधान हे नियोजन आयोगाचे अध्यक्ष असतात
१) विधान अ व ब दोन्ही योग्य असून ब हे अ चे योग्य स्पष्टीकरण आहे
२) विधान अ व ब दोन्ही योग्य असून ब हे अ चे योग्य स्पष्टीकरण नाही
३) विधान अ योग्य व ब अयोग्य
४) विधान अ अयोग्य व ब योग्य

६६. वाहकापासून जसजसे अंतर वाढत जाते, तसतशी वाहकामधील विद्युतधारेमुळे निर्माण होणाऱ्या चुंबकीय क्षेत्राची तीव्रता . ..................
१) वाढते २) कमी होते ३) समान राहते ४) यापैकी नाही

६७. योग्य जोडया लावा
१) वटवाघूळ अ) सरीसृप
२) अमिबा ब) सस्तन
३) सरडा क) संधीपाद
४) कीटक ड) आदिजीव
१) ब क ड अ २) ब ड अ क
३) ड ब क अ ४) अ ब क ड

६८. बॉक्साइटचे रासायनिक नाव काय आहे ?
१) ॲल्युमिनिअम ऑक्साइड २) ॲल्युमिनिअम क्लोराइड
३) ॲल्युमिनिअम सल्फाइट ४) हायड्रेटेड ॲल्युमिनिअम ऑक्साइड

६९. 'पोलिओ' हा रोग कशामुळे होतो ?
१) मायक्रोबॅक्टेरिअम २) एन्टोरो व्हायरस ३) निसेरिया मेनिजायटीडीस ४) सिऱ्हॉसिस

७०. ध्वनीचे सपाट पृष्ठभागावरून परावर्तन होताना परावर्तन कोन................
१) आपाती कोनापेक्षा मोठा असतो २) आपाती कोनाएवढा असतो
३) आपाती कोनापेक्षा लहान असतो ४) यापैकी नाही

७१. प्रोडयूसर गॅसमध्ये सर्वाधिक प्रमाण कशाचे असते ?
१) नायट्रोजन २) कार्बन मोनाक्साइड ३) हायड्रोजन ४) कार्बन डायऑक्साइड

७२. तारामासा हा ................
१) अपृष्ठवंशीय प्राणी आहे २) पृष्ठवंशीय प्राणी आहे
३) उभयचर पाणी आहे ४) मत्स्यवर्गीय प्राणी आहे

७३. दोन बर्फाचे ठोकळे एकमेकांवर घासल्यास काय परिणाम होईल ?
१) ते लवकर वितळतील २) ते एकमेकांना चिकटतील
३) ते टणक होतील ४) तापमान कमी होईल

७४. मुक्त / स्वतंत्रपणे जागणारे ........................ व अमोनियाचे रूपांतर नायट्राईटमध्ये घडवून आणतात.

१) नायट्रोबॅक्टर व रायझोबियम

२) नायट्रोसोकॉकस व नायट्रोबॅक्टर

३) नायट्रोबॅक्टर व नायट्रोसोमोनॉस

४) नायट्रोसोमोनॉस व नायट्रोसोकॉकस

७५. कॅथोड किरण हे ............................

१) ऋण विद्युतप्रभारित कण होत

२) धन विद्युतप्रभारित कण होत

३) विद्युतप्रभाररहित कण होत

४) कण नसून तरंग होत

७६. पायरोमीटर या उपकरणाचा उपयोग ................. होतो

१) उच्च तापमान मोजण्यासाठी

२) वायूचा दाब मोजण्यासाठी

३) हृदयाची स्पंदने मोजण्यासाठी

४) विद्युतप्रवाह मोजण्यासाठी

७७. छायाचित्रणात (फोटोग्राफी) कोणते रसायन वापरतात ?

१) सोडियम सल्फेट

२) सोडियम सल्फाइट

३) सोडियम ऑक्सॅलेट

४) सोडियम थॉयोसल्फेट

७८. ................. च्या संयोगाने पाणी तयार होते

१) हायड्रोजन + ऑक्सिजन

२) ऑक्सिजन + नायट्रोजन

३) नायट्रोजन + हायड्रोजन

४) ऑक्सिजन + हेलिअम

७९. बहिर्वक्र भिंगाच्या सहाय्याने पदार्थाएवढी वास्तव प्रतिमा मिळविण्यासाठी पदार्थ .................

१) भिंगापासून अनंत अंतरावर ठेवावा

२) भिंगापासून नाभीपलिकडे ठेवावा

३) भिंग व नाभ यांमध्ये ठेवावा

४) भिंगापासून २F अंतरावर ठेवावा

८०. 'लाजाळूच्या पानास स्पर्श केल्यास पाने मिटतात' ही वनस्पतीची कोणती हालचाल होय ?

१) उद्दिपीत २) अदिश ३) सदिश ४) प्रतिक्षिप्त

८१. एखादी वस्तू उंचीवरून सोडल्यास ........................

१) तिची स्थितीज उर्जा वाढत जाते आणि गतिज उर्जा कमी होत जाते

२) तिची गतिज उर्जा वाढत जाते आणि स्थितीज उर्जा कमी होत जाते

३) तिची गतिज उर्जा व स्थितीज उर्जा या दोन्ही कमी होत जातात

४) तिची गतिज उर्जा व स्थितीज उर्जा या दोन्ही वाढत जातात

८२. खालीलपैकी कोणत्या क्षेत्रातून 'ग्रीन हाऊस' वायू जास्त प्रमाणात बाहेर पडतो ?

१) औद्योगिक २) कृषी ३) ऊर्जा ४) वाहतूक

८३. पृथ्वीवरील सजीवाच्या निर्मितीला कारणीभूत असणाऱ्या मूलद्रव्यांचा योग्य गट ओळखा ?

१) कार्बन, हायड्रोजन, नायट्रोजन

२) हायड्रोजन, ऑक्सिजन, सोडिअम

३) कार्बन, हायड्रोजन, पोटॅशियम

४) ऑक्सिजन, कॅल्शिअम, फॉस्फरस

८४. हवेच्या प्रदूषणाची मानवनिर्मित कारणे खालीलपैकी कोणती आहेत ?

अ) श्वासोच्छवास ब) आण्विक प्रकल्प क) औष्णिक प्रकल्प ड) मानवी वसाहती

वरीलपैकी कोणते कारण बरोबर आहे ?

१) ब, क, ड २) फक्त अ ३) अ, क, ड ४) अ, ब, क

८५. लोकसंख्या संक्रमणाच्या चौथ्या अवस्थेमध्ये लोकसंख्येचा आकार हा स्थिर झालेला असतो कारण ..............

१) जन्मदर व मृत्यूदर अधिक असतात

२) जन्मदर व मृत्यूदर कमी असतात

३) मृत्यूदर कमी, जन्मदर अधिक

४) जन्मदर अधिक, मृत्यूदर कमी

८६. राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानाचा मुख्य उद्देश .................. हा आहे

अ) खाद्यान्न भाववाढ नियमन

ब) पिकांचा विकास

क) शाश्वत कृषी वृध्दी

ड) कृषी उत्पादनाची निर्यात

वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत ?

१) फक्त अ २) फक्त ब ३) क आणि ड ४) अ आणि क

८७. आपत्ती व्यवस्थापन प्रणालीतील पहिली पायरी कोणती ?

१) तयारी २) प्रतिबंध ३) पूर्व सूचना ४) पुनर्वसन

८८. लोक अदालतीबाबत खालीलपैकी कोणते विधान/विधाने बरोबर आहेत?

अ) लोकअदालतीच्या निर्णयाविरोधात नियमित न्यायालयात अपील करता येते

ब) लोक अदालत ही ना घटनात्मक, ना वैधानिक संस्था आहे

क) न्यायालयात प्रलंबित असलेले व न्यायालयापुढे न आलेले खटले लोक अदालतीत मांडले जातात

ड) ई–लोकअदालत स्थापन करणारे छत्तीसगड हे देशातील पहिले राज्य ठरले

पर्यायी उत्तरे

१) फक्त अ, ब २) फक्त क, ड ३) फक्त अ, क, ड ४) फक्त अ, ब, ड

८९. सांसद आदर्श ग्राम योजनेबाबत (SAGY) खालीलपैकी कोणते विधान खरे आहेत ?
अ) मैदानी भागात २००० ३०००आणि डोंगराळ, आदिवासी दुर्गम भागात ५०० २००० लोकसंख्या असलेल्या गावांची निवड खासदारांनी योजनेंतर्गत विकासासाठी करायची आहे.
ब) प्रत्येक खासदाराने निवडलेली ३ गावे २०१९ पर्यंत आदर्श ग्राम म्हणून विकसित केली जातील
पर्यायी उत्तरे
१) फक्त अ २) फक्त ब ३) दोन्ही अ व ब ४) अ आणि ब दोन्हीही नाही

९०. सांसद आदर्श ग्राम योजना (SAGY) संदर्भात खालीलपैकी कोणते / ते विधान / ने बरोबर नाही / त ?
अ) राज्यसभा खासदार आणि नामनिर्देशित खासदार देशातील कोणत्याही जिल्ह्याच्या ग्रामीण भागातून ग्राम पंचायत निवडू शकतात
ब) योजनेंतर्गत निवडक ग्रामपंचायतीमध्ये कोणतेच काम हाती घेण्यात आले नाही आणि खासदारांचा कार्यकाळ संपला तर अशी ग्राम पंचायत योजनेतून बाहेर पडते
पर्यायी उत्तरे
१) फक्त अ २) फक्त ब ३) दोन्ही अ व ब ४) अ आणि ब दोन्हीही नाही

९१. परिसीमन आयोगाबाबत खालीलपैकी विधाने विचारात घ्या
अ) परिसीमन आयोगाच्या आदेशांना न्यायालयात आव्हान देता येत नाही
ब) लोकसभा किंवा राज्य विधानसभेपुढे परिसीमन आयोगाचे आदेश ठेवले असता त्यांमध्ये कोणताही बदल करता येत नाही
क) जम्मू—काश्मीरसाठी परिसीमन आयोगाच्या अध्यक्षपदी सर्वोच्च न्यायालयाच्या माजी सरन्यायाधीश रंजना प्रकाश देसाई या आहेत
पर्यायी उत्तरे
१) अ अचूक, ब व क चूक २) अ चूक, ब व क अचूक
३) अ व ब अचूक, क चूक ४) ब व क अचूक, अ चूक

९२. अलीकडे चर्चेत असणारा भारतीय संविधानाचा भाग १४ ए खालीलपैकी कोणत्या विषयाशी संबंधित आहे
अ) प्रशासकीय न्यायाधिकरणे
ब) कर प्रणाली विवादांवरील न्यायाधिकरणे
क) जमीन सुधारणेसंबंधी विवादावरील न्यायाधिकरणे
ड) औद्योगिक आणि कामगार संबंधी विवादावरील न्यायाधिकरणे
पर्यायी उत्तरे
१) अ, ब, क, ड २) फक्त अ ३) फक्त अ आणि ड ४) अ, ब, ड

९३. अलीकडे चर्चेत असणाऱ्या प्रश्नोत्तरांच्या तासाबाबत (Question Hour) बाबत खालील विधानांचा विचार करा आणि योग्य पर्याय निवडा
अ) ही पध्दत अमेरिकेकडून घेण्यात आली आहे
ब) प्रश्नोत्तराच्या तासाचा कामकाज प्रक्रियेच्या नियमात उल्लेख नाही
क) या तासात मंत्र्यांसह खासगी सदस्यांनाही प्रश्न विचारले जाऊ शकतात
ड) १९९४ सालापासून प्रश्नोत्तराच्या तासाचे लाहव्ह प्रसारण (Live Telecast) करणे सुरू झाले
पर्याय
१) फक्त अ आणि ब बरोबर २) फक्त क आणि ड बरोबर
३) अ, ब आणि क बरोबर ४) वरीलपैकी सर्व बरोबर

९४. आफ्स्पा (AFSPA) कायद्यांतर्गत खालीलपकी कोण 'अशांत प्रदेश (Dlsturbed Area) घोषित करू शकतो / शकतात
अ) केंद्र सरकार
ब) राज्यपाल
क) केंद्रशासित प्रदेशात प्रशासक
पर्याय
१) फक्त क २) फक्त ब आणि क ३) फक्त अ आणि क ४) वरीलपैकी सर्व

९५. अलीकडे बातम्यांमध्ये दिसणारे 'ऑपरेशन कॅलिप्सो' कशाशी निगडीत आहे ?
१) सायबर गुन्हे २) अमली पदार्थ तस्करी
३) वाढता दहशतवाद ४) निर्वासितांचे पुनर्वसन

९६. खालीलपैकी अयोग्य जोडी ओळखा ?
अ) जनमैत्री सुरक्षा प्रकल्प: केरळ
ब) मीरा पैबी: पश्चिम बंगाल
क) कम्युनिटी पोलिसिंग प्रकल्प: आसाम
ड) उम्मीद: दिल्ली
पर्याय
१) फक्त अ आणि ब २) फक्त ब आणि क ३) फक्त अ आणि ड ४) यापैकी नाही

९७. टाटा ट्रस्टच्या 'इंडिया जस्टीस रिपोर्ट २०२०' नुसार खालील विधाने विचारात घ्या आणि अचूक विधान ओळखा ?
अ) मोठया राज्यांचा विचार करता महाराष्ट्र सलग चौथ्यांदा प्रथम स्थानी आहे
ब) देशात न्यायपालिकेमध्ये महिलांचे प्रमाण केवळ सिक्कीम राज्यात २० टक्क्यांपेक्षा जास्त आहे
क) कर्नाटक राज्यात महिला पोलीस अधिकाऱ्यांची टक्केवारी सर्वात जास्त आहे
पर्याय
१) फक्त अ २) फक्त ब ३) फक्त क ४) एकही नाही

---

९८. खालील विधानांचा विचार करा आणि बरोबर विधान / ने ओळखा ?
अ) राज्यघटनेच्या अनु. १७४ नुसार राज्यपाल राज्यातील विधानसभा बरखास्त करू शकतात
ब) राज्यघटनेच्या अनु. १६३(१) नुसार राज्यपालाला स्वविवेकाधीन अधिकार प्रदान करण्यात आले आहेत
क) राज्यविधीमंडळाचे अधिवेशन चालू असताना राज्यपाल अध्यादेश जारी करू शकतो
पर्यायी उत्तरे
१) फक्त अ आणि ब २) फक्त अ आणि क ३) फक्त ब आणि क ४) अ, ब आणि क

---

९९. राज्यसभेच्या उपाध्यक्षांच्या स्थानासंबंधी खालील विधाने विचारात घ्या आणि चूक नसलेले विधान/ने ओळखा
अ) राज्यसभेचा उपाध्यक्ष हा/ही राज्यसभेच्या अध्यक्षांना उत्तरदायी असतो / ते
ब) राज्यसभेतील उपस्थित सदस्यांच्या बहुमताने पारित केलेल्या ठरावाव्दारे त्या/तिला पदावरून दूर करता येते
क) राज्यसभेचे सदस्यत्व गमावल्यात तो/ती उपाध्यक्षपदावर राहत नाही
ड) सभागृहाच्या प्रमुखपदी असताना त्याला/ तिला मतदान करता येत नाही
पर्याय
१) फक्त अ आणि ब २) फक्त ब आणि ड ३) फक्त क ४) ब, क आणि ड

---

१००. योग्य जोडया लावा

| व्यक्ती | संस्था |
|---|---|
| अ) हरिवंश नारायण सिंग | i) राष्ट्रीय मानवी हक्क आयोग अध्यक्ष |
| ब) सरदार इक्बाल सिंग | ii) सीबीआय संचालक |
| क) सुबोध कुमार जैस्वाल | iii) राज्यसभा उपाध्यक्ष |
| ड) अरूण कुमार मिश्रा | iv) राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोग अध्यक्ष |

पर्यायी उत्तरे

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| १) | ii | i | iii | iv |
| २) | iii | iv | ii | i |
| ३) | iii | iv | i | ii |
| ४) | ii | i | iii | iv |

---